International Journal of Advance and Applied Research
www.ijaar.co.in
ISSN – 2347-7075 Impact Factor – 7.328
Peer Reviewed Bi-Monthly
Vol.11 No.2 Nov-Dec 2023

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे लोकशाही आणि धर्मविषयक चिंतन

**प्रा. प्रभुदास खाबडे**
संशोधक, पीएच. डी. संशोधक विद्यार्थी, राज्यशास्त्र विभाग, नेसावि, टिळक महाराष्ट्र विद्यापीठ , पुणे
**Corresponding Author – प्रा. प्रभुदास खाबडे**
**DOI-10.5281/zenodo.10567070**

**शोध सार—**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या वैचारिक भूमिकेचा एक एक पैलू नवा संशोधनाचा विषय आहे. प्रचंड ज्ञान साधना, विवेकी बुध्दीवाद, प्रत्येक घटकाकडे तसेच समाजजिवनाला भेडसावनाऱ्या प्रश्नांकडे पाहण्याची समग्र दृष्टी, प्रचंड वाचन आणि लिखान यामुळे बाबासाहेब आंबेडकर जगातील प्रमुख विव्दानांमध्ये गनले जातात.भारताच्या राष्ट्रनिर्मितीच्या प्रक्रियेत ज्या महामानवांनी भक्कम योगदान दिले, त्यामध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे नाव अग्रक्रमावर घ्यावे लागते. नुसते विचारांचे इमले उभे न करता त्याला कृतीची, रचनात्मक कार्यक्रमाची जोड डॉ. बाबासाहेबांनी दिली. त्यांचे समग्र विचारधन अभ्यासताना त्यांच्या व्यक्तिमत्वाची उत्तरोत्तर उंची वाढतच जाते. डॉ. आंबेडकर यांचा उदय भारतात झाल्याने राष्ट्रनिर्मितीची निसती पायाभरनीच झाली नाही तर त्यांच्या लोकशाहीवरिल चिंतनाने देशाच्या लोकशाहीला जनसाताऱ्याच्या अधिमान्यतेचे भक्कम अधिष्ठाण प्राप्त झाले असे म्हटले तरी वावगे ठरणार नाही.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी हजारो वर्षाची सामाजिक गुलामगिरी नष्ट करण्यासाठी जे विचार मांडले त्यातून त्यांचे सामाजिक विचारधन आकारास आले. बहुजन समाजाची मुक्तता करण्यासाठी त्यांनी जी पर्यायी मांडणी केली. त्यातून त्यांचे सामाजिक लोकशाहीचे विचार आकारास आले. समाजजिवन जगत असताना त्यांना आनेक वाईट प्रसंगांना सामोरे जावे लागले, त्यातून त्यांना बहिष्कृत समाजबांधवाला शोषणातून मुक्त करून माणूस म्हणून जगण्याची संधी कशी मीळविता येईल हा मुलभूत प्रश्न पडला त्यातून त्यांनी वैचारिक चळवळीला वेगळा पैलू देण्याची पर्यायी मांडणी केली. ही मांडणी म्हाणजेच डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे लोकशाही चिंतन होय. त्याची लोकशाही संकल्पना ही पाश्चात्य लोकशाही प्रमाणे कोरी कल्पना नव्हती तर त्याला सामाजिक लोकशाहीचे भक्कम अधिष्ठान होते. डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे प्रखर राष्ट्रवादी होते त्यांचा राष्ट्रवाद सर्वसमावेशक आणि धर्मनिरपेक्ष असा होता. संघप्रणित हिंदुत्ववादी राष्ट्रवाद त्यांना अमान्य होता. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी मार्क्सच्या *The criticism of religion is a beginning of all criticism'* या तत्वाप्रमाणे धर्मचिकित्सेला महत्वपूर्ण स्थान दिले होते. त्यांचे धर्मचिंतन सामाजिक लोकशाहीवर अधिष्ठित होते.

**डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे सामाजिक लोकशाहीचे चिंतन:**

आजमितीपर्यंत बहुतांश विव्दान मंडळी सांगतात, लिहितात, बोलतात म्हणून लोकशाही चिंतन म्हटले की, लोकशाहीचा राजकीय अंगाने आपण विचार करित आलो. परंतु डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी आपल्या लोकशाही चिंतनाला समाजशिलतेचा भक्कम आधार दिलेला होता. लोकशाही ही कोरी कल्पना नसून त्याला सामाजिक संदर्भ असतात. भारतामध्ये राजकीय लोकशाहीबरोबर आर्थिक व सामाजिक लोकशाही प्रस्थापित झाली पाहिजे तरच भारताच्या स्वराज्याचा आशय अधिक समृध्द होणार आहे ही भूमिका डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी मांडली. डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणतात, भारत देशाला स्वराज्य मिळणे गरजेचे आहेच पण, त्याहुनही प्राणप्रिय म्हणजे भारतीय समाजातील सामाजिक गुलामगिरी, माणसिक गुलामगिरीतून संपूर्ण शोषीत समाजाची मुक्ती झाली पाहिजे. मंदीर प्रवेश आणि लोशाही सत्याग्रहाबाबत भूमिका मांडताना बाबासाहेबांना हिंदु समाज माणूकीचे हक्क देणार आहे की नही? हा प्रश्न उपस्थित करतात मंदिर प्रवेश करून माझ्या समाजाला कर्मकांडात मला गुंतवायचे नाही. देवाची पुजा केल्याने त्यांचे प्रश्न मिटतील असे मी मुळीच मानत नाही किंवा माझी तसी मुळीच समजूत नाही. मंदिर प्रवेशाच्या घोषणेने समाजात जागृती निर्माण झालेली आहे. आपल्या हक्काची जाणिव झालेली आहे. आता अस्पृश्यांनी शिक्षणप्रसार व राजकीय हक्कासाठी झगडण्याची पराकाष्ठा केली पाहिजे *(आंबेडकर,(२००८):२७—२८).* डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना समाजात लोकशाही समानतेच्या हक्कासाठी समाजात जाणीव जागृत करावयाची होती कारण जागृत समाजच लोकशाहीला चिरंतनत्व देवू शकतो हे त्यांनी ओळखले होते. ज्या समाजात मोठयाप्रमाणात विषमता आहे. माणसाला माणूस म्हणून वागणूक मिळत नाही अशा विषतापर्ण समाजात केवळ राजकीय लोकशाही यशस्वी होवून उपयोग नाही असे ते म्हणत. समाजाचा उत्कर्ष करायचा असेल तर भारतातील सर्व समाज घटकाला समानतेचे हक्क मिळायला हवे. अस्पुश्यता समुळ नष्ठ होवून समाजातील जातीसंस्थेचे निर्मुलन व्हायला हवे. हे सामाजिक लोकशाहीच्या प्रस्थापणेमुळेच शक्य होणार आहे. ते पुढे म्हणतात आपण भारतात राजकीय लोकशाहीत यश मिळविले आहे परंतू सामाजिक व आर्थिक लोकशाही प्रस्थापित करण्यास आपल्याला अपयश आलेले आहे. साजिक आणि आर्थिक लोकशाही ही स्वातंत्र्य, समता, न्याय, बंधुत्व आणि राज्यघटनेची प्रामाणिकपणे अंमलबजावणी करूनच प्रस्थापित करता येईल.

**डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा सामाजिक लोकशाहीवादी राष्ट्रवाद:**

भारतीय राष्ट्रवादाबद्दल डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची भूमिका व्यापक आणि सर्वसमावेशक होती संकुचित राष्ट्रनिष्ठा त्यांना अमान्य होती. बुध्दीप्रामाण्यवाद हे त्यांच्या मांडणीचे प्रमूख सूत्र होते. त्यामुळे अंधधर्म श्रध्दा त्यांना साधा स्पर्श ही करू शकली नाही. त्याचा राष्ट्रवाद धर्मनिरपेक्ष होता. धर्मनिरपेक्ष शासन संस्थेने शासन व्यवहार करताना धर्म बाजूला ठेवावा शासन व्यवहारात आपला व्यक्तिगत धर्म आणू नये. राज्यकारभारात धर्म आल्याने जमातवाद बळावतो जमातवाद हा कोणत्याही धर्मिक समुदायाचा असो तो राष्ट्रीय एकात्मतेस सारखाच बाधक असतो म्हणून मी प्रथम भारतीय आहे आणि नंतरही भारतीयच आहे ही भूमिका ते घेत होते. भारतामध्ये विविध पातळयांवर विषता आहे. भारतातील जातीसंस्था, अस्पृश्यता, उच्च—निच भाव आप—पर भाव यामुळे भारतीयांची अवनती आणि मोठी हानी झालेली आहे. त्यामुळे राष्ट्र या शब्दाला आशय प्राप्त करून द्यायचा असेल तर शोषित समाज सामाजिक, माणसिक गुलामगिरीतून मुक्त झाला पहिजे. एक व्यक्ती एक मूल्य मिळाले पाहिजे. शोषित समाजाचा एक उत्कृष्ट समाजघटक म्हणून उत्कर्ष झाला पाहिजे. समताधिष्ठीत समाजीची निर्मिती होवून वंचित समाजाला माणूसकीचे निसर्गदत्त हक्क आणि अधिकार प्राप्त झाले पाहिजेत. सामाजिक आर्थिक लोकशाहीची खऱ्या अर्थाने प्रस्थापणा होत नाही तोपर्यंत राष्ट्रवादाला अर्थ प्राप्त होणार नाही ही भूमिका राष्ट्रवादाबाबत डॉ. बाबासाहेब आंबेडकर मांडत होते.

भारत देश पूर्वापार राष्ट्र होता हे एक मिथक आहे कारण राष्ट्रवाद ही संकल्पनाच मुळात आधुनिक आहे. डॉ बाबासाहेब म्हणतात, आपण एक राष्ट्र आहोत, यावर विश्वास ठेवणे म्हणजे जे अस्तित्वातच नाही ते अस्तित्वात आहे असी समजमूत करून घेण्यासारखे आहे. हजारो जातींजी विभागलेल्या समाजाचे राष्ट्र कसे बनेल? आपण सामाजिक आणि माणसिकदृष्टया अजूनही राष्ट्र नाही. *(Ambedkar B.R Righting & Speeches Vol-III 174-175 )* थोडक्यात भारताचे एक राष्ट्र होणार नाही असे त्यांना मुळीच म्हणावयाचे नव्हते तर राष्ट्र होणसाठी प्रथम सर्व प्रकारची विषमता नष्ठ होवून समतेवर, लोकशाहीवर आधारित समाज निर्माण झाला पाहिजे ही त्यांच्या राष्ट्र निर्मिती प्रक्रियेतील पूर्वअट होती. कारण 'भारतातील वसाहतवाद विरोधी असलेला राष्ट्रवाद हा जातीच्या प्रश्नाची दखल घेत नव्हता *'(इंगळे, जूलै २०१६:०६).* डॉ बाबासाहेब म्हणत त्याप्रमाणे परकियांना विरोध करणे म्हणजे राष्ट्रवाद नव्हे कारण राष्ट्रवाद वासाहतीक काळात भारतात विकसित झालेला राष्ट्रवाद हा समाजातील अभिजन लोकांचा होता. बाबासाहेबांच्या दृष्टीने वंचित ***subaltern*** लोकांचा त्यात समावेश होत नव्हता कारण,ज्याना शिक्षण, सार्वजनिक पाणवटा ते अस्पृश्य व अमंगळ आहेत असे कारण सांगून बंदी होती,अशा वंचित, शोषित समाजघटकाचे स्थान या राष्ट्र कल्पनेत कोठे होते? हा मूलभूत प्रश्न बाबासाहेबांनी उपस्थित केला तो महत्वाचा होता. एकूणच बाबासाहेब आंबेडकर यांनी मांडलेला सामाजिक लोकशाहीवादी राष्ट्रवाद हा सर्व समावेशक आणि वंचित, शोषित समाजघटकाला न्याय देणारा होता. त्यांनी म्हणून सामाजिक लोकशाहीवादी राष्ट्रवादाची पर्यायी मांडणी केली.

**डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची धर्म मिमांसा:**

लाहोच्या जात पात मोडक मंडळासमोर भाषण करण्यासाठी बाबासाहेबांनी जे भाषण तयार केले होते त्याचे *Annihilation of Cast* नावाने ग्रंथ लिहिला. यांत आणि *Riddles in Hinduism* हिंदुत्वाचा कूट प्रश्न या दोन ग्रंथात धर्मचिकित्सा केली. जातीचे निर्मुलन या ग्रंथात त्यांनी असे म्हटले की, हिंदु धर्म प्रारंभी चार वर्णांनी विभागलेला होता. कालांतराने चार वर्णांचे रूपांतर चार जातींमध्ये झाले. जातीभेद वाढतच गेला ***'जातीभेद हे श्रमाची विभागनी करते असे नही तर श्रमिकांची विभागनी करते'.*** हिंदु समाजाची वर्णाच्या आधारे झालेली पुर्णरचना ही अपमाणास्पद आहे. वर्ण नियमानुसार क्षुद्रांना ज्ञान संपादन करण्याचा अधिकार नाही. आर्थिक उत्पादन करणारा व्यवसाय बंदी आहे. शस्त्र बंदी आहे. त्यामुळे क्षुद्राने कधीच बंड केले नाही. दास्यात खीतपत पडणे हे आपले पूर्वसंचित समजून दारिद्रिय, गुलामगिरी व दास्यात खितपत राहिले पाहिजे असे तो समजू लागला. त्याचे कर्तव्य लूळे पडून तो पंगू झाला. जरी जगात कुठेही सर्व समाज पूर्णतया एकच बनलेला नाही आणि प्रत्येक समाजात वर्ग असतात तरी उतर समाजातील वर्ग मुळातच वेगळे असतात हिंदुच्या हानीचे मुळ जातीभेदात आहे जात हिंदुच्या अवनतीचे कारण आहे. जातीव्यवस्था हिंदुंच्या अखंड पराभवास कारणीभूत झाली आहे. जातीमुळे हिंदुंचे वाटोळे झाले आहे. *(कीर २७५—२८०)*

मुंबईत दादर येथे भरविलेल्या परिषदेत आपल्या समाजबांधवांना महत्वपूर्ण अपदेश डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी दिला ते म्हणतात, धर्म जाती पाळण्यास सांगत आहे त्यामुळे जाती पाळण्याचा धर्म शिकविणारी हिंदुंची धर्मशास्त्रेच त्यांची खरे शत्रू आहेत धर्मशास्त्रांच्या पावित्र्यावरील श्रध्दा नाहीशी करा, त्यांची सत्ता नाहीशी करा, त्यांची सत्ता उलथून पाडा, ती देवप्रणीत आहेत ही समजूत नाहीशी करा. हिंदु स्त्री आणि पुरूष यांना शास्त्रांच्या मानसिक गुलामगिरीतून मुक्त करा, त्यांना त्यांच्या इच्छेप्रमाणे अंतरजातीय विवाह करू द्या, ब्राम्हण स्वत:ला बुध्दीमान आणि जन्मसिध्द पुढारी समजत असतात. परोहित वर्गाची सत्ता नाहिशी करण्यासाठी निघालेल्या चळवळीचे नेतृत्व ब्राम्हण वर्ग करणार नाही कारण एकाच शरिराची दोन अवयव एकमेकांशी लढनार नहीत म्हणून जन्मजात पुरोहितगिरीची पध्दत बंद करून ती सर्व हिंदुना खुली केली पाहिजे. *(Ambedkar (2013)Annihilation of Cast उद्धृत कीर २७५—२८०)* याचा अर्थ बाबासाहेबांना हिंदु समाजाची समतेच्या अधारे पुर्णरचना करायची होती. जात निर्मुलनाच्या प्रबंधामध्ये डॉ. आंबेडकर असे म्हणतात की, हिंदु समाज हा मिथक आहे. हिंदु हा शब्द मुस्लिमांनी मुस्लिम आणि इथले लोक यांच्यातील भेद सांगण्यासाठी उच्चारलेला शब्द आहे. हा शब्द ओळख म्हणून दिलेला शब्द आहे. मुस्लिमांच्या आगमनापूर्वी कुठल्याही संस्कृत साहित्यामध्ये हिंदू हा शब्द आढळत नाही. हिंदू समाज हा समाज नसून जातींचा समूह आहे.

*(Ambedkar(2013):33)* अर्थात हिंदू हा शब्द सिंधू नदीच्या खोऱ्यात राहणाऱ्या लोंकासाठी वापरलेला प्रदेशवाचक शब्द आहे असे अनेक विचारवंतानी नमुद करून ठेवले आहे.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी महात्मा फुले आणि राजर्षी छ. शाहु महाराज यांच्यानंतर जो वारसा निर्माण केला तो अखिल भारतीय समाजाला दिशादर्शक आहे. त्यांच्या प्रमाणे आजमितीपर्यंत कोणीही धर्मचिकित्सा करू शकला नाही ही गोष्ट आज आपण प्रामाणिकपणे कबूल केली पाहिजे. बुध्दीवाद, वास्तवता, वस्तुनिष्टता साधार प्रहार आणि युक्तीवाद करण्याची दुर्दम्य विद्याशक्ती बाबासाहेब यांच्याकडे होती. ते एका ठिकानी म्हणतात, मी सांगतो ***धर्म हा मनुष्याकरिता आहे. मनुष्य धर्माकरिता नाही.*** या जगात तुम्हास जर संघटन करायचे असेल, समाज एकसंघ करायचा असेल व यश संपादन करायचे असेल तर हिंदु धर्माचा त्याग करा. जो धर्म तुम्हाला माणूस म्हणून ओळखावयास तयार नाही. जो धर्म तुम्हाला शिक्षण मीळू देत नाही, तुमच्या ऐहिक उत्कर्षाच्या आड येतो. तो धर्म या सज्ञेला पात्र नाही. जो धर्म आपल्या अनुयायांना आपल्या धर्मबांधवाशी माणूसकिला वागण्यास शिकवित नाही तो धर्म नसून रोग आहे. जो धर्म आपल्या अनुयायांना अमंगल जनावरास स्पर्श करावयास शिकवितो परंतू माणसाचा स्पर्श चालू देत नाही, तो धर्म नसून शुध्द वेडगळपणा आहे. जो धर्म काही वर्गांना शिक्षणापासून दूर ठेवतो, त्यांना धनसंचय करू देत नही,शस्त्र हाती घेवू देत नाही *(Ambedkar (2013)Annihilation of Cast उद्‌धृत कीर २७५—२८०).* त्यामुळे अशा धार्मिक व्यवस्थेला विरोध करून बहिष्कृत समाजाच्या सर्वांगिन विकासारासाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी आयूष्यभर परिश्रम घेतले.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी जे धर्मचिंतन केले त्यांनी जे सामाजिक लोकशाही राष्ट्रवादाबाबत जी भूमिका मांडली ती महत्वाची होती.

**उपसंहार:**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी राष्ट्रनिर्मितीच्या प्रक्रियेमध्ये जे योगदान दिले ते महत्वाचे होते. भारतामध्ये त्यांनी केलेल्या धर्म चिकित्सेमुळे भारतीय समाजात परोगामी विचारांची परंपरा अधिक भक्कम बनली. धर्म धर्मशास्त्रे याबाबत साधक बाधक चर्चा घडू लागली. तसेच त्यांनी केलेल्या सामाजिक लोकशाही चिंतनामुळे राज्यघटनेतील योगदानामुळे भारतामध्ये सामाजिक लोकशाहीची मूल्य रूजण्याची प्रक्रिया गतीशिल झाली. त्यांनी मांडलेल्या राष्ट्रवादाच्या भूमिकेने वंचितांच्या जीवनमरणाच्या प्रश्नांकडे लोकांचे लक्ष वेधले गेले. वंचित समाजामध्ये आपल्या राजकीय तसेच निसर्गदत्त हक्कांबाबत जाणीव जागृत झाली.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी राष्ट्रनिर्मितीच्या पार्श्वभूमिवर जे वैचारिक योगदान दिले आजही भारतीय समाजजिवनाला दिशा देण्यासाठी महत्वाचे आहेत. भारतामध्ये समताधिष्ठीत समाज निर्मितीच्या परिप्रेक्षात म्हणावी तितकी गतीशिलता दिसत नाही. परिणामी या प्रक्रियेत डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी जशी गतीशिल वाटचाल करण्यास भारतीयांना सांगितले तसे घडलेले नाही जातीभेदाची तीव्रता आज पुर्वी इतकी नसली तरी जातीसंस्था आजही नष्ठ झालेली नाही बहुतांश राज्यांचे राजकारण लोकशाही चौकटीत न होता जात जमाती भोवती घोघांवत दलित, अल्पसंख्यांक समाजघटकांवरिला अन्यायाचे प्रमाण वाढतच आहे. वारंवार जमातवादी दंगली घडविल्या जात आहेत समाजात घडणाऱ्या अनेक घटनांच्या पार्श्वभूमिवर संबध वंचित समाजाला जबाबदार धरून त्यांच्या प्रगतिचा मार्ग अवरूध्द केला जात आहे. यामुळे सुपूर्ण सामाजिक सलोखा बिघडत आहे आजच्या संबध परिस्थतीच्या पार्श्वभूमिवर डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी केलेले धर्मचिंतन आणि मांडलेल्या लोकशाहीच्या विचार आजही भारतीय समाजाला दिशादर्शक आहेत.

**संदर्भ:**


1. Ambedkar B.R (2013) : *Annihilation of Cast* Government of Maharashtra Mumbai
2. Ambedkar B.R : Righting & Speeches Vol-III
3. Ambedkar B.R : *Riddles in Hinduism*
4. Ambedkar B.R : *Caste in India: Their Mechanism, Genesis & Development*
5. आंबेडकर (२००८): *माझी आत्मकथा* नाग नालेदा प्रकाशन इस्लामपूर सांगली
6. कीर धनंजय (१९६६): *डॉ. बाबासाहेब आंबेडकर* पॉप्युलर प्रकाशन,मुंबई
7. इंगळे देवेंद्र (१५ जूलै २०१६): वर्तमान संदर्भात बाबासाहेबांची राष्ट्रकल्पना —लेख परिवर्तनाचा वाटसरू पुणे.